• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३१८ • सोमवार,दि.१९ फेब्रुवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 318 • Monday 19 Feb 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3



दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
| बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर
# मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# आगामी निवडणुकीत भाजपाचा पराभव होणार

**नागपूर । वृत्तसेवा**

भाजप दीडशे जागांच्या वर जाणार नाही. ४०० जागांचा आकडा सांगणं हा स्वतःची समजूत काढण्यासारखं आहे. ते पूर्णपणे घाबरले आहे. म्हणून ते पक्ष फोडा असे करत आहे. स्वतःच घर सुरक्षीत ठेवण्यासाठी दुसऱ्याच्या घरावर बुलडोजर चालवणारा घाबरलेला असतो, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केली वर्धा येथील विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी भाजपवर जोरदार टीका केली. यावेळी ते म्हणाले, भारतीय जनता पार्टी आणि आरएसएस असं दोन्ही म्हणतात आम्ही हिंदू धर्माचे प्रतीनिधी आहो. पहिला प्रश्न आमच्यासमोर येतो की बहुसंख्य पूर्णपणे हिंदू आहे आणि मग धार्मिक राजकारण कशासाठी याचा खुलासा मिळत नाही अशी परिस्थिती आहे. मागील दहा वर्षात जे वक्तव्य आणि कारवाई झाली त्यातून वैदिक परंपरा विरुद्ध संत परंपरा याची पुनरवृत्ती आताही दिसत आहे. संतांच्या विचारांनी आधारित जे संविधान आहे त्या विरोधात भाजप आणि आरएसएस दिसत आहे. उद्याच संविधान कस असेल या बद्दल ते चर्चा करत नाही पण जे सूचक वक्तव्य येते त्यातून हिटलरशाहीशी आधारित किंवा हिटलरशाहीला पुरस्कृत करणारी घटना असेल. १९५० ते २०१३ पर्यंत देशाचं नागरिकत्व सोडणाऱ्यांची संख्या ७२०० होती. पण २०१३ पासून आतापर्यंत २४ लाख कुटुंब तेही हिंदू कुटुंब ज्यांची मालमत्ता किमान ५० कोटी असेल अश्याना देश मजबूर करून देश सोडायला लावल. त्यांनीही नागरिकत्व सोडल आणि परदेशात जाऊन नागरिकत्व स्वीकारल. देशाचं नागरिकत्व सोडणारा वर्ग हा संत परंपरेला मानणारा होता, त्यांच्यासमोर अशी परिस्थिती केली की त्यांना नागरिकत्व सोडाव लागल. हिंदूंच्या राज्यात हिंदूंना देश सोडून जावं लागत, नागरिकत्व सोडून जावं लागत ही प्रचंड मोठी शोकांतिका आहे, अशीही टीका आंबेडकर यांनी केली. शेतकऱ्यांचा दिल्ली सीमेवर सुरु असलेल्या आंदोलनात शेतकऱ्यांची मागणी रास्त आहे. ही मागणी सरकारने मान्य केली पाहिजे, असही प्रकाश आंबेडकर यावेळी म्हणाले.



बीड – श्री राधा गोविंद मंदिर २१ वर्धापन दिन महोत्सवानिमित्त महा अभिषेक आणि होम हवन व महाप्रसाद तसेच राधाकृष्ण रथयात्रा मिरवणुकीत सहभागी होऊन महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी क्षेत्रातील मान्यवर यांच्यासह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी दत्ता थिगळे बाबुराव परळकर माजी नगरसेवक.


## गद्दारांवर महाराष्ट्र विश्वास ठेवणार नाही –आदित्य ठाकरे

**मुंबई । वृत्तसेवा**

शिवसेनेच्या कोल्हापूर येथे झालेल्या महाअधिवेशनामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी भावूक भाषण केले होते. मी एक बाप आणि नवरा म्हणून अपयशी ठरलो, असे ते म्हणाले होते. दरम्यान, ठाकरे गटाचे नेते आणि युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्या या भावूक भाषणावर घणाघाती टीका केली आहे. गद्दार आणि खोटारड्यांवर महाराष्ट्र विश्वास ठेवू शकत नाही त्यामुळे ही रडारड चालली आहे असा टोला आदित्य ठाकरे यांनी लगावला आहे. एकनाथ शिंदे यांच्या भावूक भाषणावर प्रतिक्रिया देताना आदित्य ठाकरे म्हणाले की, गद्दार आणि खोटारड्यांवर महाराष्ट्र विश्वास ठेवू शकत नाही.



बीड – श्री राधा गोविंद मंदिराच्या २१ व्या वर्धापन दिनानिमित्त बीडच्या जिल्हाधिकारी दीपाताई मुधोळ या मंदिरात आल्या असता त्यांचा सत्कार करतांना मंदिराचे उपाध्यक्ष यादवेंद्र प्रभुजी व राम सोन्नर.






संपादकीय

# आर्थिक सुधारणांची अंमलबजावणी

लोकसभा निवडणुकीनंतर नव्या सरकारने काही महत्त्वाच्या सुधारणांना कायदेशीर अधिष्ठान देणे आणि त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. कृषी, कामगार, भूमी आणि अन्य सुधारणांची गरज आहे. कामगार कायद्यात १९९० च्या दशकात सुधारणा करणे गरजेचे होते आणि ते आतापर्यंत झालेले नाही. अधिक रोजगार निर्मितीसाठी अप्रेंटिस योजनांवर भर देण्याची गरज आहे. यामुळे कमी खर्चात मनुष्यबळ आणि कौशल्य मिळू शकते. नऊ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका ग्लोबल बिझनेस समिटमध्ये केंद्र सरकारच्या तिसर्या कार्यकाळात नवा भारत वेगाने काम करेल, असे विश्वास व्यक्त केला. भारत जगातील तिसरी मोठी आर्थिक शक्ती म्हणून नावारूपास येत असल्याचे दिसत आहे. आपला अर्थिक विकासाचा दर सतत वाढत असून महसुली तूट कमी होत आहे. उत्पन्न वाढविणे आणि गरिबी कमी करण्याचा हा काळ आहे. २५ कोटी नागरिक गेल्या दहा वर्षांत गरिबीच्या बाहेर आले आहेत. मोदी म्हणाले, आपल्या सरकारने सर्व धोरणांत स्थैर्य आणि सातत्य राहण्यावर अधिक लक्ष केंद्रित केले आहे. प्रत्येक बजेटमध्ये चार गोष्टींवर अधिक भर दिला गेला. पायाभूत सुविधांचा विकास, उत्पादन वाढविण्यासंदर्भात खर्चात विक्रमी तरतूद करणे, कल्याणकारी योजना, अनाठायी खर्चांना लगाम व आर्थिक शिस्त. त्याचे उत्साहजनक परिणाम मिळाल्याचे पंतप्रधान म्हणाले. ८ फेब्रुवारी रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनीही लोकसभेत मोदी सरकारच्या कार्यकाळाची माहिती देणारी श्वेतपत्रिका मांडली. यात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली १० वर्षांत आर्थिक विकास वेगाने झाला असल्याचे म्हटले आहे. या सुधारणा जनधन योजना, आधार आणि मोबाईल आधारित अंशदान वितरणात सुधारणा (जेएएम), जीएसटी तसेच कर्ज वसुली आणि वाटप सुधारणा आणि दिवाळखोरी संहिता (आयबीसी) याचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. जागतिक पातळीवर प्रत्यक्ष परकी गुंतवणुकीतील घसरणीचा माहोल असताना भारत मात्र जगातील सर्वाधिक परकी गुंतवणूक मिळवणार्या देशांत सामील झाला आहे. भारताचा परकी चलनसाठा वेगाने वाढला आहे. भारतीय शेअर बाजार हा जगात सर्वात उच्चांकी पातळीवर असल्याचे सांगितले जात आहे. देशात २०१४ मध्ये २३४ सार्वजनिक उपक्रम होते आणि आज त्याची संख्या २५४ झाली आहे. उद्योग, कृषी, सेवा क्षेत्राचाही वेगाने विकास झाला आहे. भारत आर्थिक विकासासह जागतिक शक्ती म्हणूनही समोर आला आहे. जागतिक विकासाचे इंजिन म्हणून भारताकडे पाहिले जात आहे. भारताकडे जागतिक कंपन्यांचा ओघ सुरू झाला आहे. तसेच देशाच्या विकासात आर्थिक शिस्तीने महत्त्वाची भूमिका बजावली, हेही पाहिले पाहिजे. जगातील प्रमुख जागतिक क्रेडिट रेटिंग संस्थांनीही केंद्र सरकारचे आर्थिक धोरण आणि अर्थसंकल्प हा विकासाला अनुकूल असल्याचे म्हटले आहे. यानुसार भारताचा विकास, भारतातील गुंतवणूक आणि भारताची आर्थिक स्थिती भक्कम होण्यास हातभार लागणार आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज



शेतकरी हा राष्ट्राचा पोशिंदा आहे, शेती हा देशाचा कणा आहे, कारण आपला देश कृषिप्रधान आहे, परंतू कृषिप्रधान देशात शेती आणि शेतकरी अडचणीत आहे. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो (छउठइ) २०२२ च्या अहवालानुसार गेल्या वर्षी देशभरात एकूण १ लाख, ७१ हजार म्हणजेच दररोज ४६८ शेतकऱ्यानी आत्महत्या केल्या. विशेष म्हणजे दरवर्षी आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे. आज शेती आणि शेतकऱ्यांची परिस्थिती दयनीय, भयावह आणि चिंताजनक आहे. या पार्श्वभूमीवर सतराव्या शतकातील शिवरायांचे स्वराज्यातील शेती आणि शेतकऱ्यासंबंधीचे धोरण तारक, पूरक व उपयुक्त ठरते, इ.स.१६४४ मध्ये शिवरायांनी रायरेश्वरासमोर हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेचा संकल्प केला, शपथ घेतली, आणि स्वराज्य प्रत्यक्षात आणण्यासाठी वयाच्या १६ व्या वर्षी इ.स. १६४५ मध्ये पहिल्यांदा 'तोरणा किल्ला' जिंकला आणि 'स्वराज्याचे तोरण' बांधले. राजांनी आपल्या स्वराज्यात शेती आणि शेतकऱ्याला राजाश्रय दिला, कोणत्याही व्यवसायाला जेव्हा राजाश्रय मिळतो, तेव्हा त्या व्यवसायात भरभराट, गती, प्रगती आणि समृद्धी येते. हे शिवरायांच्या शेती आणि शेतकऱ्यांच्या धोरणावरून लक्षात येते. 'दिव्यातील ज्योत विझल्याशिवाय झोपी जावू नकोस, अन्यथा उंदिर दिव्यातील पेटती ज्योत पळवतील. कडब्याच्या गंजी पेट घेतील. गुरा-ढोरांना चारा मिळणार नाही. गुरे-ढोरे दूध देणार नाहीत. माझ्या रयतेची बालके दुधापासून वंचित राहतील. माझा भावी महाराष्ट्र दुबळा होईल. तरी दिव्यातील ज्योत विझल्याशिवाय झोपी जावू नकोस'. अशा आदेश शिवरायांनी दिला होता. यावरून शिवरायांची प्रजेबद्दलची दक्षता लक्षात येते. शेती पिकली तर 'रयत सुखी, राजा सुखी', 'शेतकरी गरीब तर राजा गरीब आणि राजा गरीब तर राज्य गरीब', हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याचे सूत्र होते. स्वराज्य हे शेती, शेतकऱ्यांच्या, रयतेच्या कल्याणासाठी आहे, ही त्यांची प्रमुख भावना होती. शेतकऱ्यांनी जीवापाड जपलेली शेती व घरदार मोगल क्षणात उध्वस्त करत, छळ करत, अशा परिस्थितीत शिवरायांनी शेतकऱ्यांना संघटित केले, आधार व संरक्षण दिले. तेव्हा शेतकरी हे स्वराज्य आपले आहे हे मानत स्वराज्यासाठी कोणतीही पर्वा न करता जीव द्यायलाही तयार होत. तेव्हा शिवरायांच्या स्वराज्यात शेतकऱ्यांचे जीवन सुरक्षीत, सुखी व समृद्ध होते. शेतकऱ्यांना रयत, कुणबी, कुळवाडी अशा नावांनी संबोधले जात असे. शेतकरी आणि शेतीला प्रतिष्ठा होती. राजांच्या स्वराज्यात प्रामुख्याने तीन गोष्टीला प्राधान्य दिले होते. पहिली नापीक जमिन पिकाऊ करणे, दुसरे म्हणजे पीक, गावकरी, शेती आणि शेतकरी यांचे संरक्षण करणे आणि तिसरी गोष्ट म्हणजे सर्व जमिनीची शास्त्र शुध्द मोजणी करून महसुल आकारणी निश्चित करणे. पुणे व परिसरात ओसाड पडलेल्या जमिनीला वहितीखाली आणणे, शेतकऱ्यांना पुन्हा उभे करणे, तसेच नपीक जमीन पिकाऊ करण्यासाठी, पिकाऊ जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी बिनव्याजी रक्कम सुलभ हप्त्याने मुदतीत फेडावी, अशी सवलत स्वराज्यात दिली जात असे. तसेच नवीन लागवडीखाली आलेल्या जमिनींवर सुरुवातीचे चार-पाच वर्षे महसूल कमी ठेवत, अनेकवेळा शत्रू शेतीसाठी आवश्यक बैल, जनावरे पळवून नेत, तेव्हा बैल घेण्यासाठी शेतकऱ्यांना बिन व्याजी कर्ज दिले जात असे. दुर्देवाने दुष्काळामुळे, अस्मानी आपत्तीमुळे किंवा टोळधाड, साथीचे रोग, युद्धातील हानी, अन्य कारणामुळे शेतकऱ्यांवर संकट आले तर अशा बिकट परिस्थितीत शेतकऱ्यांना सर्व प्रकारच मदत दिली जात आसे. वेळप्रसंगी राजे कर्जमाफी ही देत. जमिनीचे 'बागायत' व 'जिरायत' असे दोन प्रकार होते. सिंचनाशिवाय शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी येणार नाही, तेव्हा नदीनाल्यांवर बंधारे बांधून पाणी साठवणाची व्यवस्था केली, साठवलेले पाणी तसेच नदी, तलावाचे पाणी पाटाच्या साहाय्याने जमिनीला पुरविण्यासाठी शिवरायांना योजना केली होती. अशा जमिनीस 'पाटस्थल' असे म्हणत. विहिरीच्या पाण्यावर काही जमीन पिकविली जात असे. तिला 'मोटस्थल' जमीन म्हणत. सोलापूर जिल्ह्यात दुष्काळाच्या त्याकाळात मोहोळ तालुक्यात काही बंधारे बांधल्याचा उल्लेख सापडतो. शेतकऱ्याला दुष्काळ व अवर्षणाच्या तडाख्यातून वाचविण्यासाठी हे शिवरायांचे प्रयत्न दुष्काळ मुक्तीच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल होते. शिवकालीन महसूल व्यवस्थापनात जमीन मोजण्याची वैशिष्ट्यपूर्ण पद्धत होती. शेती मोजणीसाठी 'काठी' चा वापर केला जात असे. या काठीला 'शिवशाहीकाठी' म्हणतात. एक काठी पाच हात, पाच मुठी लांब असे. २०ु२० काठ्यांचा एक बिघा, १२० बिघ्याचं एक चावर असे. बिघा, चावर आदी मोजणीचे शब्द आजही वापरले जातात. एकंदर जमिनीची मोजणी करून ती लागवड करणार्यांच्या नावे लावून तिची नोंद महसूल अधिकार्याच्या दप्तरी असे. मोजलेल्या जमिनीवर महसूल निश्चित केला जाई. महसूल वा शेतसारा निश्चित करतांना जमिनीच्या प्रतवारीचा विचार केला जात असे. नापिक जमिनीवर कोणताही महसुल आकारला जात नसे. तसेच कोणत्या जमिनीत कोणते पीक घ्यावे, त्याचे पत्रकही तयार केले जात असे, यालाच आज आपण पीक पाहणी असे म्हणतो. शेतसाऱ्यांवरील कराबाबत बखरीत वर्णन केले आहे, उत्पन्नाचे पाच हिस्से केले जात, त्यात दोन सरकारकडे तर तीन शेतकऱ्याकडे राहत. महसुल रोख व धान्य स्वरूपात भरता येत असे. शेतसारा निश्चित झाल्यामुळे शेतकऱ्यावर अन्याय होत नसे. ग्रँट डफ ने या ' महसुल पध्दतीमुळे शेतकऱ्याचा फायदा झाला.' असे नमूद केले आहे. सन १६६७ ते १६६९ दरम्यान महसूल धोरण ठरवल्या गेले. महसूल व्यवस्था लोकाभिमुख होती. रयत आणि शेतकरी हा त्या व्यवस्थेचा केंद्रबिंदू होता. महसूल व्यवस्था 'अण्णाजीपंत धारा' या नावाने ओळखली जात असे. शासकीय महसूल वा कर माफक होता, परंतु शासकीय कराच्या कित्येक पट करवसूली वतनदार, इनामदार, देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी करत. तेव्हा या मंडळीला 'रयतेचा वाटा रयतेस पावे आणि राजभाग आपणास येई ते करणे' अशा आशयाच्या आज्ञा राजांनी दिल्याचे आढळते. महसुल अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांचे कल्याण साधवे, इमाने इतबारे सेवा करावी, सैन्यातील घोड्यांना दाणा-वैरण लागली, तर रोख रक्कम देऊन खरेदी केली पाहिजे, गावोगाव फिरून शेतकऱ्यांना भेटून त्यांच्या अडचणी व समस्या जाणून घ्याव्यात. अशा सूचना व आदेश राजांनी दिले होते. महाराज प्रभावळी मामल्याच्या सुभेदार रामजी अनंत यांना ५ सप्टेंबर, १६७६ ला पाठवलेल्या पत्रात म्हणतात, इमाने इतबारे स्वामीकार्य करावं अशी तू शपथ वाहिली आहेस, त्यानुसार भाजीच्या एका देठावरही मन न दाखविता रास्तपणे व योग्यपणे वागावे. रयतेचा वाटा रयतेला मिळेल आणि महसूल आपल्याला येईल ते करावे. रयतेवर काडीचाही जुलूम झाल्यास आम्ही तुझ्यावर राजी नाही हे नीट समजावे. या पत्रावरून शिवरायांची रयतेविषयी दक्षता लक्षात येते. वतनदारांच्या इनामी जमीनी काढून घेतल्या, धार्मिक संस्थांनाच्या पडीक जमिनी लागवडीखाली आणल्या. स्वराज्याचे उत्पन्न वाढावे हा या मागे उद्देश होता, तसेच ग्रामाधिकार्यांचे वाडे, हुडे, कोट महाराजांनी जमीनदोस्त केले, इतर रयतेसारखी साधी घरे बांधून राहावे, असा हुकूम सोडला. तसेच अधिकाऱ्यांनी लबाडी, स्वार्थ व भ्रष्टाचारापासून दूर रहावे, अशी ताकीद दिली होती. आरमारासाठी झाडे हवे असतील तर जीर्ण झालेले झाडे त्याच्या मालकाच्या पूर्व परवानगीने, योग्य मोबदला देऊन तोडावीत, आंबा-सागाची झाडे तोडू नयेत, शेतकऱ्यांनी त्यांना अनेक वर्षांपासून लेकराबाळांप्रमाणे वाढविलेले असते. ती झाडे तोडली तर शेतकऱ्यांच्या दुःखास पारावारा राहणार नाही. ती तोडणे म्हणजे प्रजेला त्रास देणे आहे. असा शेतकऱ्यांच्या हिताचा कल्याणकारी विचार शिवरायांनी १७ व्या शतकात केला, शेतीविषयक धोरण आखले. ते आजही आपल्याला प्रेरक आणि मार्गदर्शक आहे. तेव्हा शेतीला राजाश्रय देत, स्वराज्य आणि सुराज्य प्रस्थापित करण्याचा निर्धार राज्यकर्ते आणि जनता या दोघांनाही करायला हवा...! हीच खऱ्या अर्थाने शिवरायांच्या विचार, कार्य आणि कर्तुत्वाला आदरांजली ठरेल...




– डॉ.खेत्री, (मो.न. ७८४३०९२२४४)

## नमुना- इ- 4
(नियम 18 पहा)

**निवडणूक निर्णय अधिकारी:- एस. एस. देशपांडे**
**सहकारी संस्थेचे नाव:- संत कबीर मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्या. गगनाथवाडी (नेकनुर) ता. जि. बीड**

पदनाम:- **कार्यालय अधिक्षक, संलग्न जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड जि. बीड**
अंतिम मतदार यादी प्रसिध्दी दिनांक:-05/02/2024

महाराष्ट्र सहकारी संस्था, (समितीचे निवडणूक) नियम 2014 च्या नियम 18 अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन आणि मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा.जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, बीड यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या सदस्यांच्या निवडीकरीता मी, **एस. एस. देशपांडे, कार्यालय अधिक्षक** संलग्न, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड आणि मा.जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, बीड व मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने **संत कबीर मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्या. गगनाथवाडी (नेकनुर) ता. जि. बीड** यांच्या समितीच्या सदस्यांची सन 2024 ते 2029 या कालावधीची निवडणूक घेण्याकरीता नियुक्त केलेला निवडणूक निर्णय अधिकारी याद्वारे **संत कबीर मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्या. गगनाथवाडी (नेकनुर) ता. जि. बीड** म्हणून ओळखल्या जाणा-या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवड करण्याच्या निवडणूकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करुन दि.20.02.2024 पासुन जाहीर करीत आहोत आणि सोबत जोडलेल्या अनुसूचिच्या स्तंभ 2 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघाच्या किंवा मतदार संघाच्या संबंधातील निवडणूक नियम करीत आहोत.

**अनुसूची**

| अ क्रं | मतदार संघाचे नांव | | नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठीची तारीख (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा व वेळ) | नामनिर्देशन पत्रांची सूची प्रसिध्द करणे | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिवस आणि वेळ व ठिकाण | विधीग्राहय नामनिर्देशनपत्रांची सूची प्रसिध्दीची तारीख | उमेदवाराने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याची तारीख | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना चिन्हांचे वाटप व उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्दी दिनांक | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ आणि ठिकाण | मतमोजणी तारीख, वेळ व ठिकाण | मतदानाचे निकाल घोषीत करण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1 | सर्वसाधारण | 8 | दि.20.02.24 ते दि.26.02.24 (सुटीचे दिवस वगळून ) सकाळी 11.00 ते दु.3.00वाजेपर्यत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.20.02.24 ते दि.26.02.24 जसे अर्ज प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज दु.4.00 वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.27.02.24 सकाळी 11.00 पासुन छाननी संपेपर्यत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.28.02.24 सकाळी 11.00 वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.28.02.24 ते दि. 13.03.24 सकाळी 11.00 ते दु.3.00 पर्यत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.14.03.24 सकाळी 11.00 वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.24.03.24 वेळ- सकाळी 8.00 ते दुपारी 4.00 पर्यंत, ठिकाण:- **जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड "सहकार शक्ती" इमारत, पहिला मजला, स्टेडियम कॉम्प्लेक्स, जालना रोड, बीड.** | दि.24.03.24 वेळ- दु.4.15 पासुन ठिकाण:- **जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड "सहकार शक्ती" इमारत, पहिला मजला, स्टेडियम कॉम्प्लेक्स, जालना रोड, बीड.** | दि.24.03.24 मतमोजणी संपल्यानंतर लगेच ठिकाण **जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड "सहकार शक्ती" इमारत, पहिला मजला, स्टेडियम कॉम्प्लेक्स, जालना रोड, बीड.** |
| 2 | महिला | 2 | | | | | | | | | |
| 3 | अनुसुचित जाती/ जमाती | 1 | | | | | | | | | |
| 4 | इतर मागासवर्गीय | 1 | | | | | | | | | |
| 5 | भटक्या विमुक्त जाती/ जमाती व विशेष मागास प्रवर्ग | 1 | | | | | | | | | |
| | **एकुण** | 13 | | | | | | | | | |

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता:- जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ता. बीड, जि. बीड पहिला मजला, "सहकार शक्ती" इमारत, स्टेडियम कॉम्प्लेक्स, जालना रोड, बीड.
संपर्क क्रमांक:- 8830466894, 9075192534 ईमेल आयडी – ddr_bid@rediffmail.com
निवडणूक संदर्भातील इतर अटी व शर्थी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात पहावयास मिळतील.

**(एस. एस. देशपांडे)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**संत कबीर मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्या. गगनाथवाडी (नेकनुर) ता. जि. बीड**

**(समृत जाधव)**
**जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड**

**(अशोक गाडे)**
**सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे**

## शिवजयंतीनिमित्त पुण्यातील वाहतुकीत मोठे बदल

पुणे – गेल्या दोन वर्षांपासून कोरोना महामारीमुळं शिवभक्तांना शिवजयंती साजरी करता आलेली नव्हती. परंतु यंदा कोरोनाचे कोणतेही नियम अथवा निर्बंध नसल्यामुळं धुमधडाक्यात शिवजयंती साजरी केली जाणार आहे. राज्यातील अनेक शहरांमध्ये शिवजयंतीच्या जल्लोषासाठी मंडळांनी जोरदार तयारी केलेली आहे. परंतु आता शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील वाहतुकीत मोठा बदल करण्यात आला आहे. मिरवणुकीसाठी वाहतुकीत बदल करण्यात आला असून प्रवाशांना पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात आले आहेत. जिजामाता चौक येथुन शिवाजी रस्तावरुन स्वारगेटला जाणारे वाहन चालकांनी स. गो. बर्वे चौकातून जंगली महाराज रस्त्याने खंडोजीबाबा चौक टिळक चौक ते टिळक रस्त्याने इच्छित स्थळी जावे. गणेश रस्ता – दारुवाला पुलाकडुन फडके हौद चौक, जिजामाता चौकाकडे येणारी वाहतुक – दारुवाला पुल चौकातुन वाहचालकांना इच्छितस्थळी जाता येईल. केळकर रस्त्याने अप्पा बळवंत चौकातून जोगेश्वरी मंदीर चौक मार्गे बुधवार चौकाकडे येणारी वाहतुक आवश्यकते नुसार वळविण्यात येणार आहे. मिरवणुक लक्ष्मी रस्त्यावर असताना सोन्या मारुती चौक पास होईपर्यंत आवश्यकतेनुसार लक्ष्मी रोड वरील वाहने संतकबीर चौक समर्थ विभाग हद्दीतुन वळविण्यात येईल. पुरम चौकातुन बाजीराव रस्त्यावरुन शिवाजीनगरकडे जाणाऱ्या वाहनचालक पुरम चौकातून टिळक रस्त्याने अलका टॉकीज चौक व पुढे एफ. सी. रोडने इच्छितस्थळी जातील. मिरवणुका सुरू झाल्यानंतर आप्पा बळवंत चौकातून बुधवार चौकाकडे व बाजीराव रस्त्याने फुटका बुरुजकडे न जाता सर्व वाहने केळकर रस्त्याने सरळ पुढे इच्छितस्थळी जातील. मिरवणुका गाडगीळ पुतळा पास होऊन जाणार नाहीत तोपर्यंत सर्व वाहने सावरकर भवन पुलावरुन बालगंधर्व बाजुकडे किंवा टकले हवेली चौकामार्गे इच्छितस्थळी जातील. मिरवणुका गाडगीळ पुतळा पास होईपर्यंत वाहनांना शनिवार वाड्याकडे न जाता येणार नाहीत.

## पोलिसांनी राज्यातील नक्षल समर्थक ३६ संघटनांची ओळख पटवली

नागपूर : सध्या महाराष्ट्रातील नक्षल विरोधी अभियानाच्या रडावर शहरी नक्षलवाद आहे. नक्षल समर्थक असलेल्या राज्यातील ३६ संघटनांची पोलिसांनी ओळख केली पटवली असून, त्यावर पाळत ठेवली जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे पोलिसांच्या हाती लागलेल्या कागदपत्रांवरून शहरी नक्षलवाद्यांनी राज्यातील प्रमुख शहरात मजबूत संघटन उभारल्याचे नक्षल विरोधी अभियानाचे प्रमुख संदीप पाटील यांनी सांगितले आहे. संदीप पाटील यांनी म्हटले आहे की, सीपीआय (माओवादी) या नक्षलवाद्यांच्या संघटनेत पीपल लिबरेशन गोरिला आर्मी व युनाटेड फ्रंट या दोन शाखा आहे. युनायटेड फ्रंट हा शहरी भागात काम करत असून, शहरात पार्टी कमिटी, पार्टी फ्रॅक्शन व पार्टी सेलच्या माध्यमातून तीन स्तरावर काम चालते. या नेटवर्कने महाराष्ट्रात झालेल्या भीमा कोरेगाव आंदोलन, बारसू रिफायनरी, आरे कारशेड या आंदोलनामध्येमध्ये आपली सक्रिय उपस्थिती नोंदविल्याचे संदीप पाटील यांनी सांगितले. त्यामुळे शहरी नक्षलवादाचा धोका लक्षात घेता सरकार या संदर्भात कडक कायदा आणण्याच्या तयारीत असल्याचे, संदीप पाटील यांनी सांगितले.

## उद्योग व्यवसायाला आणखी बळकटी

पुणे –संरक्षण उत्पादन क्षेत्रात 'आत्मनिर्भर भारता'च्या वाटचालीला आणखी बळकटी देण्यासाठी राज्य शासनाच्या उद्योग विभागामार्फत महाराष्ट्रातील संरक्षण साहित्य उत्पादन करणाऱ्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राला चालना देण्याच्या उद्देशाने २४ ते २६ फेब्रुवारीदरम्यान पुणे येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि कन्व्हेन्शन सेंटर येथे 'महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पोचे' आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे संरक्षण उत्पादन क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना सक्षम करणारा महाराष्ट्रातील अशा प्रकारचा हा पहिलाच डिफेन्स एक्स्पो असणार आहे. संरक्षण उत्पादन क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्राविण्य असणाऱ्या उद्योगातील समन्वयाला चालना देण्याचे उद्देशाने भारतीय नौसेना, लष्कर आणि वायुसेना या तिन्ही सुरक्षा दलांचा यात महत्वाचा सहभाग असणार आहे. यात २०० हून अधिक सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग, स्टार्ट–अप आणि २० हजारपेक्षा अधिक अभियांत्रिकी विद्यार्थी एकत्र येऊन ज्ञानाची देवाणघेवाण करतील. भारताचे औद्योगिक शक्तिस्थान म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्र हे आत्मनिर्भर भारताचे संवर्धन करण्यात आघाडीवर असलेले राज्य आहे. राज्यात ३९ लाख ८८ हजार एमएसएमईचे मजबूत जाळे आहे. ज्यात उद्यम पोर्टलवर १ कोटी ८ लाख रोजगार आहेत. एमएसएमई डिफेन्स एक्स्पो अशा उद्योगांना त्यांच्या क्षमतांचे प्रदर्शन करण्यासाठी आणि संरक्षण उद्योगातील प्रमुख भागधारकांशी जोडण्यासाठी मोठे व्यासपीठ प्रदान करेल.

## माजलगावमध्ये तरूणीवर बलात्कार

माजलगाव – लग्नाचे आमिष दाखवून तरूणीवर बलात्कार केल्याची घटना उघडकीस आली आहे.या प्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात आरोपी विरूध्द बलात्कारासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल झाला आहे. माजलगाव येथे शहर पोलीस ठाणे हद्दीत एका तरूणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याची घटना दि.२५ मार्च २०२१ ते दि.२८ डिसेंबर २०२३ या कालावधीत घडली. या प्रकरणात आरोपीने पिडितेला जातीवाचक शिवीगाळ करून अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी संजय आसाराम राजुरकर (रा.सेलु जि.परभणी) याच्याविरूध्द दि.१६ फेब्रुवारी २०२४ रोजी गुन्हा दाखल झाला असुन पुढील तपास पोलीस करत आहेत.

# भाजपाचे काही आमदार, खासदार आमच्या संपर्कात – पटोले

मुंबई । वृत्तसेवा

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांमध्ये उभी फूट पाडल्यानंतर भाजपाने नुकताच काँग्रेसला धक्का दिला आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक चव्हाण यांना आपल्या गोटात ओढत भाजपाने त्यांना राज्यसभेची उमेदवारी दिली आहे. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर अशोक चव्हाण भाजपासोबत जाणे हा काँग्रेससाठी मोठा धक्का मानला जात आहे. दरम्यान, फोडाफोडी करून इतर पक्षांमधील नेत्यांना आपल्या पक्षात घेणाऱ्या भाजपामध्येच पुढच्या काही दिवसांत फूट पडणार असल्याचे संकेत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिले आहेत. भाजपाचे काही आमदार आणि खासदार आमच्या संपर्कात असून, योग्य वेळी आम्ही हातोडा मारू, असे नाना पटोले यांनी म्हटले आहे. लोणावळा येथे झालेल्या काँग्रेसच्या दोन दिवसीय राज्यस्तरीय शिबिरानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, भाजपाचे काही विद्यमान आमदार आणि खासदार आमच्या संपर्कात आहेत. जेव्हा आम्ही हातोडा मारू तेव्हा तुम्हाला ते दिसेलच. मात्र



आमच्यासाठी ही महत्त्वाची बाब नाही आहे. आमच्यासाठी सध्या ज्या प्रकारे महाराष्ट्र पेटवण्याचं पाप भारत जलाओ पार्टीने केलं आहे. या भारत जलाओ पार्टीला महाराष्ट्र पेटवण्याचा काय अधिकार आहे. त्यामुळे भाजपाचे जे विद्यमान आमदार, खासदार आमच्यासोबत येण्यास इच्छुक असतील त्यांच्याबाबत वेळेनुसार निर्णय घेऊ, असे नाना पटोले यांनी सांगितले. दरम्यान, या चिंतन शिबिरामध्ये संबोधित करताना नाना पटोले म्हणाले होते की, लोणावळ्यात दोन दिवसाच्या शिबिरातून चांगले बौद्धीक व वैचारिक मंथन झालेले आहे. काँग्रेसचा कार्यकर्ता असल्याचा अभिमान बाळगून काम करा. काँग्रेस पक्ष संपूर्ण राज्यात एकजूट असला पाहिजे. सर्व सेल, फ्रंटल संघटना सर्वांनी सोबत असले पाहिजे. पक्षाच्या अजेंड्यावरच सर्वांनी काम केले पाहिजे व काँग्रेसचा कार्यकर्ता म्हणून पक्षाच्या अजेंड्यानुसारच काम करा आणि लोकसभेची लढाई जिंकायची आहे हा संकल्प घेऊनच जा. आता आपल्याकडे वेळ नाही, युद्ध पातळीवर काम करायचे आहे. भाजपा कसे खोटे बोलत आहे, जनतेची फसवणूक करत आहे हे लोकांमध्ये जाऊन सांगा, कुठेही कमी पडू नका. आघाडीला विजयी करुन भाजपाचा पराभव करावा लागणार आहे. वातावरण काँग्रेस व मविआच्या बाजूने आहे. नरेंद्र मोदींच्या सत्तेचे दरवाजे महाराष्ट्र बंद करु शकतो, हे लक्षात घ्या, असा दावाही नाना पटोले यांनी केला.

## परीक्षांच्या काळात प्रशिक्षणाला शिक्षकांचा विरोध

मुंबई । वृत्तसेवा

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून (एससीईआरटी) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) अनुषंगाने राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या क्षमता वृद्धीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येणार आहे. मात्र, आधीच शिक्षकांना लावण्यात आलेल्या विविध अशैक्षणिक कामांमुळे शाळांचे नियोजन बिघडले आहे. त्यातच ऐन दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या कालावधीत मुंबईतील चार हजार शिक्षकांना नव्याने प्रशिक्षणासाठी जावे लागणार असल्याने शाळांचे नियोजन बिघडणार आहे. त्यामुळे शिक्षकांनी प्रशिक्षण स्थगित करण्याची मागणी केली जात आहे. एससीईआरटीकडून खोपोली येथे प्रशिक्षण घेतलेल्या तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून पुढील आठवड्यापासून १०० टक्के शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण करण्याचे निर्देश एससीईआरटीने दिले आहेत. ३१ मार्चपासून दहावीची परीक्षा सुरु होत आहे. या परीक्षांच्या कामकाजात शिक्षक व्यस्त आहेत. त्यातच आठवी, नववी तसेच अकरावीच्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रमही पूर्ण करून परीक्षांचे नियोजन शिक्षकांना करावे लागणार आहे. मात्र, आधीच विविध अशैक्षणिक कामांमुळे विद्यार्थ्यांचे वर्ग बुडाले आहेत.

## लोकसभेच्या ४८ जागा जिंकण्याचे लक्ष्य –रमेश चेन्नीथला

मुंबई । वृत्तसेवा

लोकसभेच्या निवडणुकीसाठी फार कमी वेळ राहिला आहे. आता निवडणुका सायंटिफिक पद्धतीने लढवल्या पाहिजेत यावर चर्चा झाली आहे. बुथ मॅनेजमेंट हे सर्वांत महत्त्वाचे आहे. इंडिया आघाडीला सत्तेत आणण्यासाठी काम केले पाहिजे आणि राज्यातून सर्व ४८ जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवा, असे आवाहन प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी शनिवारी काँग्रेसच्या शिबिरात केले. लोणावळ्यातील दोन दिवसांच्या राज्यस्तरीय शिबिरात समारोपाचे मार्गदर्शन करताना चेन्नीथला पुढे म्हणाले की, भाजप लोकशाहीला संपविण्यासाठी बसले आहेत. आता आपल्यासमोर 'करा किंवा मरा' अशी परिस्थिती आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर भाजप सातत्याने टीका करत असतात त्यामागे गांधी–नेहरूंची विचारधारा संपवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले, काँग्रेस पक्ष संपूर्ण राज्यात एकजूट असला पाहिजे. सर्व सेल फ्रंटल संघटना सर्वांनी सोबत असले पाहिजे. पक्षाच्या अजेंड्यावरच सर्वांनी काम केले पाहिजे. लोकसभेची लढाई जिंकायची आहे हा संकल्प घेऊनच जा. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, नोटबंदी, जीएसटीची अंमलबजावणी, अचानक लावलेला लॉकडाऊन, शेतकऱ्यांविरोधात पुकारलेले युद्ध आणि भ्रष्टाचार या पाच मुद्द्यांमुळे अर्थव्यवस्थेची गती मंदावली आहे. त्यामुळेच पंतप्रधान मोदी सातत्याने भारताची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकाची असल्याचे सांगत असतात. देशातील लोकशाही वाचविण्यासाठी एकत्र या, असे आवाहन अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केले. शिबिरास ऑनलाइन उपस्थित राहून त्यांनी मार्गदर्शन केले. 'डरेंगे तो मरेंगे, लडेंगे तो जितेंगे' असा कानमंत्रही त्यांनी कार्यकर्त्यांना दिला.

## भाजप म्हणजे भारत जलाओ पार्टी –काँग्रेस

मुंबई । वृत्तसेवा

महाराष्ट्रात सातत्याने मोठ्या राजकीय घडामोडी घडत आहेत. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी भाजपमध्ये प्रवेश करत काँग्रेसला मोठा धक्का दिला. यानंतर त्यांना भाजपकडून राज्यसभेची उमेदवारी देखील देण्यात आली. अशोक चव्हाण यांच्या या निर्णयानंतर काँग्रेसचे आणखी काही आमदार भाजपसोबत जाणार असल्याची चर्चा रंगली आहे. यातच आता काँग्रेने केलेले विधान चर्चेत आले आहे. भाजपचे अनेक आमदार आमच्या संपर्कात असल्याचा दावा नाना पटोले यांनी केला आहे. भाजपचे अनेक आमदार आमच्या सोबत आहेत. आम्ही जेव्हा हातोडा मारू तेव्हा तुम्हाला दिसेल. मात्र सध्या हा विषय महत्त्वाचा नाही. भारत जलाऊ पार्टी म्हणजेच भारतीय जनता पार्टीने महाराष्ट्र जाळण्याचे पाप केले. भाजपला महाराष्ट्र जाळण्याचा अधिकार नाही. भाजपचे जे विद्यमान आमदार, खासदार आमच्यासोबत येण्यास इच्छुक असतील त्यांच्याबाबत वेळेनुसार निर्णय घेऊ , असे नाना पटोले म्हणाले. त्यांच्या या दाव्यानंतर चर्चांना उधाण आले आहे. लोणावळा येथे झालेल्या काँग्रेसच्या दोन दिवसीय राज्यस्तरीय शिबिरामध्ये काँग्रेसचा कार्यकर्ता असल्याचा अभिमान बाळगून काम करा, असे सांगितले आहे. काँग्रेस पक्ष संपूर्ण राज्यात एकजूट असला पाहिजे. काँग्रेसचा कार्यकर्ता म्हणून पक्षाच्या अजेंड्यानुसारच काम करा आणि लोकसभेची लढाई जिंकायची आहे हा संकल्प करा. नरेंद्र मोदींच्या सत्तेचे दरवाजे महाराष्ट्र बंद करु शकतो.

# राज्यभरात मोतिबिंदू शस्त्रक्रियेची विशेष मोहिम

मुंबई । वृत्तसेवा

राष्ट्रीय अंधत्व आणि दृष्टिक्षीणता नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत, १९ फेब्रुवारी ते ४ मार्चदरम्यान राज्यभरात विशेष मोतिबिंदू शस्त्रक्रिया मोहीम राबवण्यात येणार आहे. या कालावधीमध्ये एक लाख रुग्णांवर मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट आरोग्य विभागाने ठेवले आहे. सार्वजनिक रुग्णालये, मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्था तसेच रुग्णालयांमध्ये विनामूल्य मोतिबिंदू शस्त्रक्रिया केल्या जाणार असून त्याचा सामान्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाने केले आहे. या मोहिमेअंतर्गत राज्यभरात एक लाख शस्त्रक्रिया करण्यासाठी आरोग्य विभागाने जिल्हानिहाय नियोजन केले असून संबंधित आरोग्य अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना या मोहिमेची जबाबदारी देण्यात आली आहे. केंद्र सरकारची राष्ट्रीय नेत्र ज्योती अभियान ही विशेष मोहीम जून २०२२पासून राबवण्यात येत आहे. या मोहिमेमध्ये ५० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या व्यक्तींमध्ये अंधत्व आणि एसव्हीआयला कारणीभूत असलेल्या मोतिबिंदूवरील शस्त्रक्रियांचा अनुशेष पूर्णपणे भरून काढण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या कार्यक्रमाअंतर्गत, २०२२ ते २०२५ या तीन वर्षांत २७ लाख मोतिबिंदू शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट आहे. या मोहिमेमुळे नागरिकांना मोफत शस्त्रकियेचा लाभ घेता येणार आहे. सन २०२२–२३मध्ये राज्यात मोतिबिंदू शस्त्रक्रियेचे ११२.५१ टक्केउद्दिष्टसाध्य करण्यात आले आहे, तर २०२३–२४ या आर्थिक वर्षात डिसेंबर २०२३पर्यंत एकूण उद्दिष्टाच्या ६७.३० टक्के मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. २०२३–२४ या आर्थिक वर्षातील मोतिबिंदू शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी १९ फेब्रुवारी ते ४ मार्च या कालावधीत जिल्हा स्तरावर 'विशेष मोतिबिंदू शस्त्रक्रिया मोहीम' राबवण्यात येणार आहे. उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य संस्थांसह, अशासकीय स्वयंसेवी संस्था तसेच खासगी संस्थांचे सहकार्य घेण्यात येणार आहे. याविषयी किंवा इतर आरोग्य विषयक सल्ला घेण्यासाठी नागरिकांनी १०४ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.


## जाहिर प्रगटन

**मा. श्री.आर.जी.बागडे साहेब**
**४ थे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर बीड**
**यांचे न्यायालयात**
**विशेष दिवाणी दावा क्र. ६१/२०१७**
**स्टेट बँक ऑफ इंडिया वादी**
**विरूध्द**
**जयश्री गोरख वाघमारे व इतर प्रतिवादी**
**प्रति, २) लक्ष्मीकांत पि. रामविलास बियाणी, वय सज्ञान, धंदा व्यापार, रा.शास्त्रीनगर, नालवंडी रोड,बीड**

ज्याअर्थी, प्रति, अर्जातील वादी यांनी रिकव्हरीचा सूट प्रतिवादी विरूध्द या न्यायालयात दाखल केला आह, त्या सबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक २७/०३/२०२४ रोजी दिवसा १०.३० वाजता तुम्ही स्वत: किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्त्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देवू शकेल अशा वकिलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्यादिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याचदिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद सेट ऑफ, किंवा प्रविाद काऊंटर क्लेम, ज्या दस्तऐवजांवर आधारला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या स्टेट ऑफ, किंवा प्रतिवादाच्या काऊंट क्लेम, पुष्टयार्थ, पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करून ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनात जोडावी. तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास, तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र आहे.

**आज दिनांक १६/०२/२०२४ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिले.**

कोर्टाचा शिक्का
आदेशावरून.
स्वाक्षरीत
अधिक्षक,
दिवाणी
न्यायालय,व.स्तर,बीड.
मार्फत
अॅड.शिंदे

## जाहिर प्रगटन

**मा.अविनाश म.पाटील ५ वे दिवाणी न्यायाधीश क.स्तर,बीड,ता.जि.बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १८१/२०२४**
**निलावती व ईतर वि.निरंक**

ज्यापेक्षा **श्रीहरी बंडु मस्के,** रा. मौजे पालवण, ता.जि.बीड हे दिनांक १२/०६/२०१४ रोजी मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार
**१) निलावती शिवाजी मस्के, पत्ता पालवण, ता.जि.बीड, २) मनिषा सुरेश मस्के, पालवण, ता.जि.बीड, ३) शंकर सुरेश मस्के, पालवण, ता.जि.बीड, ४) ओंकार सुरेश मस्के, पालवण, ता.जि.बीड, ५) मोहिनी रविंद्र शेंदाडे, पिंपरगव्हाण, ता.जि.बीड, ६) रोहिणी संदीप शेळके, पालवण, ता.जि.बीड.**

अर्जदार क्र. १ ही **मयत श्रीहरी बंडु मस्के** यांची भावजयी असून अर्जदार क्र. २ ही मयताची चुलती म्हणजेच मयताचा सख्खा भाऊ शिवाजी बंडू मस्के यांची सून व मपयत पुतण्या सुरेश शिवाजी मस्के यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. ३ व ४ मयताचे चुलत नातू म्हणजे मयत पुतण्या सुरेश शिवाजी मस्के यांची मुले आहेत. अर्जदार क्र. ५ व ६ या मयताच्या विवाहित नाती म्हणते मतय पुतण्या सुरेश शिवाजी मस्के यांच्या मुली आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना/अर्जदारांना सदरहू **मयत श्रीहरी बंडु मस्के** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

पु.ता. ०७/०३/२०२४
**आज दिनांक १६/०२/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

क.लिपीक
कोर्टाचा शिक्का
आदेशावरून
स्वाक्षरीत/–
अधिक्षक
दिवाणी न्यायालय,
व.स्तर,बीड.
मार्फत
अॅड.उबाळे

## जाहिर प्रगटन

**मा.श्री.ओ.एन.मंत्री साहेब, २ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दि.अर्ज क्र. ३१७/२०१४**
**साबेराबी अहेमद पाशा अन्सारी**
**व ईतर विरूध्द निरंक**

**अर्जदार : १) साबेरावी भ्र. अहेमद पाशा अन्सारी, रा.पात्रूड, ता.माजलगांव,जि.बीड, ह.मु. कटकपुरा, बुंदेलपुरा, बीड, ता.जि.बीड, २) मुख्तार पि. अहेमद पाशा अन्सारी, रा.वरीलप्रमाणे, ३) अन्सारी अझीज पि. अहेमद पाशा अन्सारी, रा.वरीलप्रमाणे, ४) शेख नसीर पि. अहेमद पाशा अन्सारी, रा. वरीलप्रमाणे, ५) अन्सारी शेख मुस्ताख पि. अहेमद पाशा अन्सारी, रा. वरीलप्रमाणे.**
**विरूध्द निरंक**
**मागणी : बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत अहेमद पाशा मो. फयाजोद्दिन अन्सारी** यांचा मृत्यू झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.
ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत अहेमद पाशा मो. फयाजोद्दिन अन्सारी** यांचा मृत्यू दिनांक १२/११/२०१९ रोजी झाला आहे. यांचे मृत्यू वरील अर्जदाराशिवाय मयताचे कोणीही कायदेशीर वारस नाहीत.
**मयत अहेमद पाशा मो. फयाजोद्दिन अन्सारी** यांच्या मृत्यूनंतर वरील अर्जदार यांना शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सरहून मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू **मयत अहेमद पाशा मो.फयाजोद्दीन** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक १७/०२/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.**
**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २७/०३/२०२४ आहे.**

कोर्टाचा शिक्का
आदेशावरून
स्वाक्षरीत
अधिक्षक
दिवाणी न्यायालय
व.स्तर,बीड
मार्फत
अॅड.अंडील

## जाहिर प्रगटन

**मा.श्रीमती डी.के. पाटील कोर्ट नं. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश,**
**क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज २९८/२०२४**
**सलीम व इतर विरुध्द निरंक**

**अर्जदार : १) सलीम पि. मोहम्मद पठाण, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. बेलखंडी (पाटोदा), ता.जि.बीड**
**मागणी अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र (Heirship Certifiacte) मिळणेबाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत नामे बानुबी भ्र. महमंद पठाण** यांचे बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी **मयत नामे बानुबी भ्र. महमंद पठाण,** रा.बेलखंडी (पाटोदा), ता.जि.बीड याचां मृत्यू दिनांक १५/९/२०२३ रोजी राहते घरी बेलखंडी (पाटोदा), ता.जि.बीड येथे झाला. अर्जदार हा मयताचा एकमेव मुलगा आहे. अर्जदाराला ईतर कोणी भाऊ किंवा बहिण नाही. मयताचे पती **पठाण महंमद कोंदन खॉं** हे दिनांक १२/०९/२०१० रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार हा मयताचा वारस आहे व मयतास सदर अर्जदाराशिवाय ईतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्यूनंतर वरिल अर्जदारांना कार्यालईन उपयोगासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. असे अर्जदार यांनी अर्जात नमूद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर त्यांनी या जाहिर नाम्याच्या तारखेपासून एक महिन्यात या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळते की जर सदर मुदतीत कोणी आल्या योग्य हरकती दाखविल्या नाही तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याना सदर **बानुबी भ्र. महंमद पठाण** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक १५/०२/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.**
**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २६/०३/२०२४**

क.लिपीक
कोर्टाचा शिक्का
आदेशावरून
स्वाक्षरीत/–
अधिक्षक
दिवाणी न्यायालय
व.स्तर,बीड
मार्फत
अॅड. नांदे

# कुणबी नोंदी, प्रमाणपत्र वाटपात बीड जिल्हा मराठवाड्यात अव्वल -जिल्हाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

राज्यभरात मराठा समाजाच्या कुणबी नोंदी शोधण्याचे काम युध्द पातळीवर होत आहे. मराठवाड्यात आतापर्यंत सुमारे ४२ हजार कुणबी नोंदी सापडल्या असून यातील १९ हजाराहून अधिक नोंदी एकटया बीड जिल्ह्यातील आहेत. त्यासोबतच कुणबी प्रमाणपत्र वाटपातही बीड जिल्हा मराठवाडयात अव्वल आहे. या जिल्ह्यातून आतापर्यंत २१ हजार ७७६ कुणबी प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आहेत. धाराशिव मधून ४१४९ तर लातूरमध्ये अवघे ८१६ प्रमाणपत्र वाटण्यात आले आहेत. राज्यभरात कुणबी नोंदी शोधण्याची मोहीम हाती घेण्यात



आल्यानंतर बीड जिल्ह्यात प्रशासनाने मोठया प्रमाणावर काम केले. सामाजिक कार्यकर्त्यांनी देखील प्रशासनाला मदत केली. परिणामी बीड जिल्ह्यात मराठवाडयात सर्वाधिक नोंदी सापडल्या आहेत. विशेषतः भूमी अभिलेख विभागाच्या अखत्यारीत असलेल्या नमुना ३२,३३ मधील नोंदींची संख्या मोठी आहे. जिल्ह्यात सुमारे २२ लाखांहून अधिक अभिलेख तपासण्यासात आले आहेत. जिल्हयातील ४६५ गावांमध्ये या कुणबी नोंदी सापडल्या. या नोंदींची संख्या १९ हजार ९२४ इतकी झाली आहे. कुणबी नोंदी शोधण्यासोबतच कुणबी प्रमाणपत्र देण्यात देखील प्रशासनाने तत्परता दाखविली आहे. जिल्हाधिकारी दीपा मुधोळ - मुंडे, नोडल अधिकारी असलेले निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांचा पाठपुरावा आणि सर्वच उपविभागीय अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्ययवाहीतून बीड जिल्ह्यात आतापर्यंत २१ हजार ७७६ प्रमाणपत्रांचे वितरण झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांनी दिली. हा आकडा मराठवाडयात सर्वाधिक आहे. जालनाही पिछाडीवर मनोज जरांगे यांच्या आंदोलनामुळे राज्यात चर्चेत असलेला जालना जिल्हा कुणबी नोंदी आणि प्रमाणपत्र वाटपात मात्र पिछाडीवर आहे. या जिल्ह्यात ४६६४ नोंदी सापडल्या असून ४६९३ प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले आहेत.

## आरोपीला घेऊन जाणाऱ्या पोलीसांच्या गाडीवर हल्ला

केज - अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार ज्ञानेश्वर बेल्हेकर आणि त्यांचे सहकारी पोलिस हवालदार प्रविण इंगळे, पोलिस शिपाई कुलदिप घोळवे हे स्कार्पिओ या वाहनाने वाहन क्र. (एम एच १६/ सी व्ही ५५५५) केज येथे आले. त्यांनी केज पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वाघमारे यांना सोबत घेऊन एका जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद असलेला आरोपी प्रतिक भैरवनाथ चाळक यास तपासकामी ताब्यात घेण्यासाठी लव्हूरी येथे गेले होते. त्या वेळी प्रतिक चाळक आणि त्याचे सोबतचे इतर साथीदार हे एका गाडीच्या बोनटवर केक ठेवून कुणाचा तरी वाढदिवस साजरा करीत होते. त्या नंतर दि. १६ फेब्रुवारी रोजी दुपारी २:०० वा. च्या सुमारास जामखेड पोलीस हे त्यांच्याखाजगी वाहनाने आरोपी प्रतीक चाळक यास घेऊन निघाले असता २० ते २५ जणांनी स्कॉर्पिओ गाडीने क्र (एम एच-४४/झेड-२३००) यांनी पाठलाग करून त्यांना केज येथील शिवाजी चौकात गाडी आडवी लावून अडविले. त्यानंतर जमावातील एकाने हातातील लोखंडी रॉड व दगड पोलिसांच्या गाडीवर मारून काचा फोडल्या आणि आतील पोलीस हवालदार प्रवीण इंगळे यांचे गचुरे धरून मारहाण केली. गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दुचाकी गाड्यांची समोरासमोरा धडक

वडवणी- वडवणीकडून तेलगांवकडे जाणारी स्पेंलेडर गाडी क्र. एमएच ४४ एम ३१९३ व तेलगांवकडून वडवणीकडे येत आसतानाची प्लसर गाडी क्र. एमएच ४४ व्हि ५५९४ ह्या दुचाकी गाड्यांची समोरासमोरा जबरदस्त धडक बसनी असून यामध्ये दोन्ही गाड्यावरील चालकांना मार लागला होता. तर स्पेंलेडर गाडीवरील चालक टोकेवाडी येथील रहिवाशी असल्याच सांगण्यात येत आहे. (नाव समजू शकले नाही) वय अंदाजे ३० वर्ष हे जागीच ठार झाले आहेत. तर प्लसर या दुचाकीचा चालक व पुसरा येथील युवक विकास शहादेव झोडगे (वय-२७ वर्ष) याला उपाचारासाठी बीड येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. परंतु गंभीर मार लागला असल्याने त्यांचा देखील रात्री ११ वाजता उपचारादरम्यान मृत्यु झाला आहे. सदरील परस्थिती पाहता गाड्याचा चक्काचूर झाल्याचे दिसून आले आहे. या अपघातातील दोन्ही गाड्या वडवणी पोलीस स्टेशनला जमा करण्यात आल्या आहेत.

## वैद्यनाथ साखर कारखान्याला नोटीस

बीड : भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे यांच्या वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याला कर्मचाऱ्यांचा ६१ लाख ४७ हजार रुपये थकीत पीएफ न भरल्याने काल कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने कारखान्याला नोटीस बजावली असल्याचे समोर आले आहे. मागच्या काही महिन्यांपासून वेगवेगळ्या कारणाने वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना बंद आहे. त्यामुळे या साखर कारखान्याने कर्मचाऱ्यांच्या पीएफची रक्कम संबंधित कार्यालयाकडे न भरल्याने ही नोटीस देण्यात आली असल्याचे समोर येत आहे. यापूर्वी साखरेवरील जीएसटी न भरल्या प्रकरणी नोटीस काही दिवसापूर्वी याच वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याने १९ कोटी रुपयांच्या साखरेवरील जीएसटी न भरल्या प्रकरणी नोटीस दिली होती. त्यानंतर आता बंद असलेल्या वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्यांच्या पीएफची रक्कम संबंधित कार्यालयाकडे न भरल्याने जीएसटी कार्यालयानंतर आता पीएफ कार्यालयाने सुद्धा नोटीस बजावली असल्याचे समोर आले आहे. पंकजा मुंडे यांच्या ताब्यात असलेल्या वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना हा मागच्या अनेक महिन्यापासून पाण्याची कमतरता दुष्काळ सदृश परिस्थिती या सोबतच वेगवेगळ्या कारणाने बंद आहे. त्यामुळे या सहकारी साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्यांच्या पीएफची रक्कम ही कार्यालयात अद्यापही भरण्यात आलेली नाही. काही दिवसांपूर्वी जीएसटी विभागाने वैद्यनाथ कारखान्यास १९ कोटी थकीत असल्याने नोटीस बजावली होती. त्यामुळे लोकसहभाग व लोकचळवळीतून १९ कोटी रुपये देण्याची तयारी कार्यकर्ते आणि समाज बांधवांनी केली होती. मात्र, पंकजा मुंडे यांनी यासाठी साफ नकार दिला होता.मराठवाड्यातील शेतकऱ्यांना याचा फायदा व्हावा यासाठी त्यांनी परळी वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना उभारला होता. दिवंगत भाजप नेते गोपीनाथ मुंडे यांनी उभा केला होता. त्यांच्या नंतर आता या साखर कारखान्याचे अध्यक्ष या पंकजा मुंडे आहेत.

# वडवणीत ५१ लाखांचा धाडसी दरोडा!

**वडवणी । प्रतिनिधी**

दि.७ फेब्रुवारी २०२४ रोजी वडवणी चिंचवण रोड येथे कापूस व्यापाऱ्याची गाडी अडवून बेदम मारहाण करत ५१ लाख रुपयांचा धाडसी दरोडा टाकणाऱ्या टोळीस पकडण्यात बीड पोलिसांना यश आले आहे. यात सहा आरोपींना अटक केली असुन त्यांच्याकडून तब्बल ४१ लाख रुपयाची रोकड आणि एक स्विफ्ट डिझायर गाडी असा एकूण ४५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी उत्कृष्ट काम केल्याबद्दल स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना दहा हजार रुपयांचे बक्षीस दिले. यासंदर्भात पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. दरोड्याने बीड जिल्हामध्ये खळबळ उडाली आठ दिवसांपूर्वी घाटसावळी येथील कापूस व्यापारी शामसुंदर आण्णासाहेब लांडे, हे माऊली जिनींग केज येथे ७६० क्विंटल कापुस विक्रीसाठी घेऊन गेले होते. कापुस विक्रीतून आलेले ५१ लाख घेऊन ते घरी परतत होते. यावेळी पाळत ठेवून दरोडेखोरांच्या टोळीने त्यांना सोन्नाखोटा रोडवर अडवत लाथा बुक्क्यांनी व काठ्यांनी मारहाण करत त्यांच्या जवळील पैशाची बॅग हिसकावून घेत पळ काढला. या प्रकरणात शामसुंदर लांडे यांच्या तक्रारीवरून वडवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. यात पोलिसांनी सूत्र हलवून मुख्य आरोपी बालाजी महादेव पुरी त्याच्या साथीदार १) शांतीलाल उर्फ गणेश दामोधर मुंडे वय २१ रा. गोपाळपुर ता.धारुर, २) बालाजी रामेश्वर मैद वय २० वर्ष रा.मैदवाडी, ता.धारुर, ३) गोविंद उर्फ भाऊ नवनाथ नेहरकर (वय ३३ वर्षे रा. बाराभाई गल्ली), केज यांना ताब्यात घेवून त्यांना विश्वासात घेवून विचारपुस केली असता त्यांनी सदर लुटीचा गुन्हा हा माऊली जिनींग मधील मार्केट कमिटीचा कामगार ४) सुर्यकांत लक्ष्मण जाधव रा. केज याचे मदतीने ५) करण विलास हजारे (वय २० वर्षे रा.केज), ६) बालाजी रामेश्वर मैंद (वय २० रा.गोपाळपुरा), ७) संदिप वायबसे (फरार) यांनी मिळून केल्याची कबुली दिली आहे.

## मराठा आंदोलकांनी महामार्ग रोखला

**बीड । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आणि मराठा आंदोलक मनोज जरांगे- पाटील यांच्या समर्थनार्थ राज्यातील मराठा समाज आक्रमक झाला आहे. आज (शनिवार) जिल्ह्यात आणि तालुक्यातील गावा गावांत मराठा समाजाने रास्ता रोको आंदोलन केले. घाटसावळी, पिंपळनेरमध्ये गावामध्ये मराठा बांधव आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. घाटसावळी गावातून जाणारा बीड - परळी महामार्ग आंदोलकांना रोखला. पिंपळनेर गाव बंदची घोषणा मराठा बांधवांनी दिली. गेल्या अर्ध्या तासापासून हा महामार्ग अडवण्यात आल्यानं वाहतूक खोळंबली आहे.

# भारताच्या इतिहासातले सुवर्ण पान छत्रपती शिवरायांची जयंती

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या नव्हे तर भारताच्या इतिहासातले सुवर्णपान. जाणता राजा, रयतेचा राजा, लोक कल्याणकारी, प्रजाहितदक्ष, श्रीमंत योगी, छत्रपती अशा असंख्य बिरुदावलींसह तमाम मराठी जनांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे सिंहासनाधीश्वर छत्रपती श्री शिवाजी महाराज यांची जयंती आपण सन्मानाने व अभिमानाने साजरी करतो. राजकारण, अर्थकारण, धर्मकारण, तत्वज्ञान, व्यापार, सैन्य उभारणी, स्त्री-दाक्षिण्य, मुत्सद्देगिरी असे अनेक पैलू महाराजांचे आहेत. ज्यांचा अभ्यास करावयास गेलो तर कदाचित उभा जन्मही पुरेल की नाही अशी शंका आहे. आपण महाराजांबद्दल एका अशा गोष्टीची माहिती घेणार आहोत, ज्यातील विचार रुजवणे व त्याची अंमलबजावणी तातडीने होणे गरजेचे आहे. नव्हे ते आज आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्यच आहे. असे म्हणा ना! एकीकडे निजामशाही, आदिलशाही, मोगलशाही यासारखे बलाढ्य जमिनी शत्रू तर दुसरीकडे पोर्तुगीज, डच, इंग्रज असे समुद्री शत्रू. अशा कठीण अवस्थेत अपुरे मनुष्यबळ, अपुरी शस्त्रास्त्रे व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्य स्थापन करणारे महाराज एकमेवाद्वितीय होत. जमिनीवरील शत्रू पुरते नामोहरम झाले होते आता राहिला समुद्र. स्वराज्य आणखी भक्कम करायचे असेल तर समुद्रमार्गे होणारे आक्रमण रोखले गेले पाहिजे. त्यासाठी आरमार हवे. ज्याचे आरमार, त्याचा समुद्र हे महाराज ओळखून होते त्यासाठी १६५८ मध्ये शिवाजी महाराजांनी कोकण किनारपट्टीवर मराठा आरमार उभारले. आरमार म्हटले की जहाज बांधणी आली आणि जहाज बांधणीसाठी लाकूड आवश्यक होते. आवश्यक लाकूडफाटा कसा गोळा करायचा यासाठी महाराजांनी एक आज्ञापत्र जारी केले. या आज्ञापत्रातून रयतेच्या काळजाचा ठाव घेणारी आणि काळाच्याही पुढे जाणारी महाराजांची दूरदृष्टी कशी होती हे दिसून येते. काय होते ते आज्ञापत्र? आरमारास तख्ते, सोट, डोलाच्या काठ्या आदिकरुन थोर लाकूड असावे लागते. ते आपले राज्यात अरण्यामध्ये सागवानादि वृक्ष आहेत त्यांचे जे अनुकूल पडेल ते हुजूर लेहून हुजरचे परवानगीने तोडून न्यावे. याविरहित जे लागेल ते परमुलकीहून खरेदी करून आणवीत जावे. स्वराज्यातील आंबे, फणस आदिकरुन हेही लाकडे आरमाराचे प्रयोजनाची. परंतु त्यास हात लावू न द्यावा. काये म्हणोन की ही झाडे वर्षा दो वर्षांनी होतात यैसे नाही. रयतेने ही झाडे लावून लेकरांसारखी बहुतकाळ जतन करून वाढविली. ती झाडे तोडिलियावरी त्यांचे दुःखास पारावार काये? येकास दुःख देऊन जे कार्य करीन म्हणेल ते कार्य करणारासहित स्वल्पकाळेच बुडोन नाहीसेच होते. किंबहुना धन्याचेच पदरी प्रजापीडणाचा दोष पडतो. या वृक्षांच्या अभावे हानीहि होते. याकरिता ही गोष्ट सर्वथा होऊ न द्यावी. कदाचित येखादे झाड जे बहुत जीर्ण होऊन कामातून गेले असेल तरी त्याचे धन्यास राजी करून द्रव्य देऊन त्याच्या संतोषे न्यावे. बलात्कार सर्वथा न करावा. वरील आज्ञापत्राचे बारकाईने अवलोकन केले तर महाराजांनी पर्यावरणासह रयतेच्या भावनांचाही सखोल विचार केलेला दिसून येतो. त्याकाळी वृक्ष या नैसर्गिक साधन संपत्तीची विपुलता होती.

# मराठा आरक्षण प्रश्नी रास्ता रोको आंदोलन

**केज । प्रतिनिधी**



मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या आंदोलनास पाठिंबा म्हणून मराठा बांधवांनी शनिवारी सकाळी ११ वाजता केज - अंबाजोगाई रस्त्यावर चंदनसावरगाव येथे दीड तास रास्ता रोको आंदोलन केले. मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू असताना मराठा आरक्षणावर सरकार निर्णय घेत असल्याने मराठा बांधव आक्रमक बनले आहेत. जरांगे यांच्या उपोषणाला पाठींबा देण्यासाठी चंदनसावरगाव येथे मराठा आंदोलक डिगांबर तपसे यांचे ही अमरण उपोषण चालू आहे. तर चंदनसावरगावसह परिसरातील अनेक गावातील मराठा बांधवांनी मराठा आरक्षणावर सरकारने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, मनोज जरांगे यांच्या आंदोलनास पाठींबा देण्यासाठी शनिवारी सकाळी रस्त्यावर उतरून केज - अंबाजोगाई रस्त्यावर दीड तास रास्ता रोको आंदोलन केले. आंदोलनकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करीत सरकारविरोधात रोष व्यक्त केला. अनेकांनी भाषणातून सरकारवर टीका करीत आरक्षणावर निर्णय घ्यावा. अन्यथा तीव्र आंदोलन करू असा इशारा ही दिला. आंदोलनात चंदनसावरगावसह परिसरातील सहा गावातील मराठा तरुण, नागरिक, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. रास्ता रोको आंदोलन दीड तास सुरू राहिल्याने केज - अंबाजोगाई रस्त्यावरील वाहतूक ठप्प राहिली. रस्त्याच्या दोन्ही बाजूने २ कि. मी. अंतरावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

# बीडमध्ये शिक्षकाने सोडविला गैरहजर ८५ विद्यार्थ्यांचा पेपर

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणे यांच्यावतीने घेतलेल्या बीडमध्ये घेतलेल्या टंकलेखन (टायपींग) परिक्षेतील घोटाळ्याचा मास्टरमाईंड हा आयटी शिक्षक असल्याचे समोर आले आहे. प्रशिक्षित १७ लोकांच्या मदतीने या शिक्षकाने ८५ विद्यार्थ्यांचे पेपर सोडवून त्यांचा बनावट हजेरी पटही तयार केला. या सर्व प्रकारणाच्या चौकशीनंतर शिक्षणाधिकाऱ्यांनी सायबर पोलिस ठाणे गाठले. याप्रकरणी आयटी शिक्षकाविरोधात गुन्हा दाखल झाला असून शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे. पी.एस.नागरगोजे असे या शिक्षकाचे नाव आहे. २० डिसेंबर २०२३ रोजी बीडच्या आदित्य इंजिनिअरिंग महाविद्यालयात मराठी, हिंदी आणि इंग्रजी विषयाची टायपींग परिक्षा घेण्यात आली होती. या ठिकाणी आदित्य कॉलेजच्या प्राचार्यांनी नागरगोजे यांची आयटी टीचर म्हणून नियूक्ती केली होती. दुपारच्या सत्रात एका विद्यार्थ्याने अवघ्या ३० मिनिटांत पाचही सेक्शन (थेरी, ई-मेल, लेटर, स्टेटमेंट, स्पीड पॅसेज) सोडविल्याचे दिसले. परिषेदच्या अध्यक्षांना याबाबत संशय आल्याने त्यांनी केंद्र संचालकांना खात्री करण्यास सांगितले. यावर परीक्षा केंद्रात २० विद्यार्थी हजर दिसले, तर ऑनलाइन हजेरीत ३३ विद्यार्थी होते. त्यानंतर तीन दिवसांचा अहवाल घेतला असता तब्बल ८५ विद्यार्थी केंद्रात गैरहजर असतानाही त्यांनी परिक्षा दिल्याचे दिसले. यावर अध्यक्षांनी बीडचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांना चौकशी करण्याचे आदेश दिले. त्यांनी चौकशी केल्यानंतर यात नागरगोजे यांचाच हात असल्याचे उघड झाले. त्यानंतर त्यांनी सायबर पोलिस ठाणे गाठून नागरगोजे यांच्याविरोधात फिर्याद दिली आहे. त्यावरून गुन्हा दाखल झाला असून सायबर पोलिस तपास करत आहेत. जे ८५ विद्यार्थी गैरहजर असतानाही हजर दाखविले त्या ज्ञानदीप कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट, वडवणी (४३) प्रगती टायपिंग संस्था, माजलगाव (२४) आदित्य संगणक टायपिंग संस्था, माजलगाव (८) गणेश टाइपरायटिंग संस्था, वडवणी (७) इतर ३ या संस्थेचे चालकही अडचणीत आले आहेत. त्यांना देखील यात सहआरोपी करण्याची शक्यता असून त्यादृष्टीने सायबर पोलिस तपास करत आहेत. परिक्षा परिषदेने टीचर आणि विद्यार्थी यांचे पासवर्ड नागरगोजे यांच्या वैयक्तीक मेल आयडीवर पाठविल होते. त्यामुळे गैरहजर ८५ विद्यार्थ्यांची ऑनलाईन हजेरी दिसल्याने त्यांना दोषी ठरविण्यात आले आहे. त्यांनीच इतर १७ किंवा त्यापेक्षा अधिक प्रशिक्षित लोकांकडून या विद्यार्थ्यांचा पेपर सोडविल्याचे फिर्यादीत नमूद आहे. आता १७ लोक आणि ८५ विद्यार्थी कोण आहेत? तसेच या शिक्षकासोबत आणखी कोणी आरोपी आहेत का? याचा शोध सायबर पोलिस घेणार आहेत. दरम्यान, गैरहजर ८५ विद्यार्थ्यांची बनावट हजेरीपटही चौकशी समितीला केंद्रावर आढळून आले आहे.


## Election Programme of Shrimati Rajubai Gunajirao Vairale Multi State Co-Operative Credit Society Limited Majalgaon Taluka Majalgaon Dist. Beed

## Election For Board Members

| Sr.No. | Particulars | Date | Time | Place |
|---|---|---|---|---|
| 1 | Publication of Provisional List of Members / Delegates, Eligible to Vote | 19th February, 2024 (Monday) | 11.00 AM | |
| 2 | Time Window for Raising Objection (if any) to the Provisional List | 20th February, 2024 to 1st March, 2024 (Tuesday to Friday) | 11.00 AM to 3.00 PM (Every Day) | Head Office otf the Shrimati Rajubai Gunajira Vairale MultiState Co-Operative Credit Society Ltd. Majalgaon Taluka Majalgaon Dist Beed |
| 3 | Publication of Final List of Members / Delgates, Eligible to Vote | 2nd March,2024 (Saturday) | 11.00 AM | |
| 4 | Issue and Filing of Nomination Form | 4th March, 2024 to 11 th March, 2024 (Monday to Monday) | 11.00 AM to 3.00 Pm (Every Day) | |
| 5 | Publication of List of Nominations Received | 11 th March, 2024 (Monday) | 5.00 PM | |
| 6 | Scrutiny of Received Nomination Forms | 12 th March, 2024 (Tuesday) | 11.00 AM to 3.00 PM | |
| 7 | Publication of List of Valid Nominations | 12 th March, 2024 (Tuesday) | 5.00 PM | |
| 8 | Withdrawal of Nominations | 13 th March, 2024 (Wednesday) | 11.00 AM to 3.00 PM | |
| 9 | Publication of Final List of Costesting Candidates | 13 th March, 2024 (Wednesday) | 5.00 PM | |
| 10 | Date of Polling, if Necessary | 27th March, 2024 (Wednesday) | 8.00 AM to 4.00 PM | |
| 11 | Counting of Votes & Declaration of Result | 27th March, 2024 (Wednesday) | Immediate After Polling | |

Returning Officer
Sing.
Shrimati Rajubai Gunajira Vairale MultiState co-operative Credit Socity Ltd. Majalgaon


Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com